International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# वर्तमानात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांची आवश्यकता

**प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके**
*सहयोगी प्राध्यापक,*
*यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीर जि. वाशिम*
***Corresponding Author –प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके***
**DOI - 10.5281/zenodo.15240999**

***सारांश :***

*महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संतांनी दिशाहिन झालेल्या समाजाला दिशा दाखविण्याचा प्रयत्न् केला. संतांनी जी शिकवण दिली, जे विचार दिले ते केवळ एका विशिष्ट जातीसाठी, धर्मासाठी,पंथासाठी नव्हते तर संतांचे विचार हे अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी होते. मराठी संतांनी मराठी माती, संस्कृती समृध्द केली व भावभक्तीचा सुगंध दिशादिशांना पसरवून महाराष्ट्राचे वेगळेपण सिध्द केले. तसेच चिरकाल टिकणारे अक्षय विचारधन सबंध मानव जातीला दिले.*

***बीजशब्द् : अज्ञान, अंधश्रध्दा,कर्मकांड,लोककल्याण, आत्मोन्नती, ग्रामगीता, समाजोन्नती.***

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात खंजेरी भजनाच्या निनादाने समाज जागृतीचे महान कार्य करणारे एक क्रांतीकारक युगपुरुष म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होत. त्यांनी लिहिलेला ग्रामगीता हा ग्रंथ मानवी जीवनाला स्वकर्तृत्वाची दिशा आणि प्रेरणा देणारा आहे. जागतिक वाङमयात ज्या कलाकृतीचा प्रभाव जनमानसावर आहे,त्यातील एक म्हणजेच 'ग्रामगिता' होय 'ग्रामगीता' हा गंथ राष्ट्रसंतांनी ग्रामनाथाला अर्पण करुन 'ग्रामीण विकास म्हणजे देशाचा विकास ' हे ध्येय समोर ठेवून मूल्यगर्भ विचारांची पेरणी ग्रामगीतेत केली आहे.ग्रामवासीयांनीच नव्हे तर नगरवासीयांनी सुध्दा राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेतील विचार आचणात आणले तर निश्चितच सर्वांगसुंदर जीवन अनुभवास येईल.

**उद्देश :**

१) वर्तमान काळात राष्ट्रसंतांच्या विचारांचे महत्व समजावून घेणे.
२) राष्ट्रसंतांच्या शैक्षणिक , सामाजिक, धार्मिक , सांस्कृतिक विचारांचा अभ्यास करणे.
३) राष्ट्रसंतांचे विचार हे ग्रामीण जीवनाला दिशादर्शक कसे ठरतात, याचा अभ्यास करणे.
४) राष्ट्रसंतांच्या विचारामुळे ग्रामीण जनतेला जीवनाचा खरा मार्ग कसा सापडेल याचा शोध घेणे.
५) राष्ट्रसंतांचे विचार नव्या पिढीसमोर आणणे.

**विषय विवेचन :**

राष्ट्रसंतांचे विचार अखिल मानवजातीच्या विकासाचे,उध्दाराचे प्रेरणास्त्रोत तर भारताचे अमोल संस्कारधन होय. भारतीय संतपरंपरेतील आत्मोन्नती, समाजोन्नती, राष्ट्रोन्नती या त्रयीचा समन्वय साधून, राष्ट्रसंतांनी जनजागृतीचे अत्यंत मोलाचे कार्य केले आहे. सांप्रत काळातील समस्यांना अनुलक्षुन बुध्दीजीवी व श्रध्दाशिल अशा दोन्ही वृत्तीच्या लोकांना पटतील असे समन्वयात्मक् विचार मांडल्यामुळे संतपरंपरेतील राष्ट्रसंतांचे स्थान

अनन्यसाधारण ठरले आहे. इथल्या अशिक्षित, अज्ञानी अंधश्रध्दाळु जनतेला, जगण्याची नवी उर्मी देण्याचे, त्यांना ताठ उभे करण्याची प्रेरणा ही राष्ट्रसंतांनी आपल्य वाणी व लेखणीव्दारे दिली.

**१) ग्रामगीतेतील विचार :**

राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेत ग्रामजीवनाचे प्रतिबिंब उमटले आहे. खेडयातील जाती जमाती व लोककला, शेतकरी व शेती सणोत्सव , यात्रा-मेळे, देव-देवळे वैवाहिक जीवन, अत्यसंस्कार, अतिथी देव भव, रुढी, प्रथा, परंपरा एकूणच ग्रामकुटूंबाचे चित्रण राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत चितारले आहे. खेडे हे सुखी व समृध्द व्हावे हे महात्मा गांधी यांचे रामराज्याचे प्रत्यक्षात आकार देण्याचे कार्य् राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून केले आहे.

ग्रामगीतेची निर्मीतीच मुळी कर्तव्यप्रधानतेवर आधारलेली आहे. मी कोण आहे? माझे माझ्याप्रति, कुटूबाप्रति,गावाप्रति, देशाप्रति व विश्वाप्रति काय कर्तव्य आहे याची जाण ओळख समाजातील प्रत्येक घटकाला करुन देण्यास राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेतून उदात्् कार्य केले आहे. नवभारताच्या निर्मीतीत ग्राम व ग्रामस्थाना महाराजांनी अनन्य् साधारण महत्व दिले.

**खरे नाम निष्काम ही ग्रामसेवा ।**
**झटू सर्वभावे, करु स्वर्ग गावा ।**
**कळो हे वळो, देह कार्यी पडू दे ।**
**घडू दे प्रभो, एवढे हे घडू दे ॥**

भारतातील बहुसंख्य जनता खेडेगावात राहते. तेव्हा भारताची उन्नती व्हायची असेल तर या खेडेगावांची सर्वांगिण सुधारणा झाली पाहिजे. सध्या अज्ञान , दारिद्रय, भोळया समजुती वगैरेनी गावातील जनता ग्रासली आहे. तिच्या जीवनातील हर एक बाबीविषयी योग्य विचार तिच्यापुढे मांडून, तिला स्वत:चा उध्दार करण्यास प्रवृत्् करणे हा उद्देश महाराजांचा हा ग्रंथ लिहिण्यमागे होता.

**२) ग्रामविकासातून देशविकास :**

देशाचा मुळ घटक गाव असल्यमुळे गाव जर अज्ञानी, दु:खी, कष्टी, दरिद्री, रोगी असले तर देशही तसाच राहिल. गावावरुन देशाची परीक्षा होते, याची सुज्ञ माणसांनी आपल्या ह्रदयात खुणगाठ बांधावी . ग्रामीण जनतेच्या जीवनाचा विकास हे देशापुढील आज सर्वात महत्वाचे कार्य आहे, असे ते म्हणत. कारण स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आपला भारतीय समाज अज्ञान,अंधश्रध्दा, अनारोग्य, हिंसा, व्यसनाधिनता, क्रौर्य, दुराचार , लोभ, व्देष , निंदा परपीडा अनेक वेदनांनी ग्रासलेला होता . राष्ट्रसंतांनी भारतीय समाजाचे दु:ख ज्यावेळी जवळून पाहिले तेव्हा त्यांचे ह्दय पाझरुन गेले.

**'गावा-गावासी जागवा भेदभाव हा समूळ मिटवा ।**
**उजळा ग्राममोन्नतीचा दिवा तुकडया म्हणे ॥**

भारतीय ग्रामीण समाजातील माणूस सुशिक्षित, स्वयंपूर्ण, सुजाण आणि सुसंस्कृत् व्हावा यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील शोषित , पिडीत , पददलित , दु:खी व गरीब लोकांचे दु:ख दुर करण्यासाठी रात्रंदिवस राबले . ग्रामीण माणसाला एक सदाचारी माणूस, एक जाणता माणूस बनवावे हेच राष्ट्रसंतांचे विचार, कार्य होते.

राष्ट्रसंतांनी भक्ती, सेवा, आणि माणुसकीच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची नवी लाट निर्माण केली. समाज जागृतीची नवी चळवळ उभी केली. समाज विकासाचे नवे आंदोलन निर्माण केले. राष्ट्रसंतांच्या विचाराची उंची आणि कृपेची करुणा त्यांच्या भजन- प्रवचनातून ओसंडून वाहतांना दिसते.

**३) सामुदायिक प्रार्थनेमधील विचार :**

राष्ट्रसंतांची सामुदायिक म्हणजे समूह मनाच्या बांधणीचे एक सर्वेत्तम् साधन होते. 'हे गुरुदेव से यह संसार हो अति उच्च्तम जिवन बने, परमार्थ्मय व्यवहार हो 'हेच त्यांचे ध्येय होते.राष्ट्रसंतांना सामुदायिक प्रार्थनेतून विश्वप्रेम, विश्वशांती आणि विश्ध्वर्म् अशा त्रिवेणी सुविचारांची गंगा सामुदायिक मानसभूमित निर्माण करावयाची होती. कारण नेतून मानसिक शांती लाभते आणि माणूसकीची भावना वाढीस लागते.असे त्यांचे म्हणने होते. 'सर्व् धर्माचा समन्वय विश्व् शांतीचा उपाय

'हा विचार त्यांना सामुदायिक प्राथनेतून लोकमनात रुजवावयाचा होता.

वंदनीय महाराजांनी घालुन दिलेली ' सामुदायिक प्रार्थना ' हे सर्वधर्म् समन्वयाचे आदर्श विद्यालय आहे. त्यांनी ग्रामगीतेत सांगीतले आहे की,

सर्व धर्माचा समन्व्य , विश्व् शांतीचा उपाय
लोक सुधारणेचे विद्यालय, सामुदायिक

हे सर्वानी लक्षात ठेवावे. सर्व् शाळा- महाविद्यालयात, सर्व सार्व्जनिक स्थ्ळी ही सामुदायिक व्हावी हिच त्यांची मनोमन इच्छा होती.

**४) स्त्री शिक्षणाला महत्व् :**

महाराष्ट्रात स्त्री जातीच्या पारतंत्र्याचे मुळ तिच्या अज्ञानात आहे. तारुण्याच्या उंबरठयावर उभ्या असलेल्या मुली, बालीका तसेच स्त्रिया अजूनही अशिक्षित आढळतात.स्त्री शिक्षित झाल्याशिवाय तिला आपल्या सर्वागिण गुलामीची जाणीव होणे शक्य् नाही व ही जाणीव होईपर्यंत ती स्वत:हून बंड करायला प्रवृत्त् होणार नाही. हे त्यांनी ओळखले होते. त्यासाठी त्यांनी स्त्री शिक्ष्णावर जोर देवून स्त्री पुरुष समानतेचे महत्व् सांगणतांना ते म्हणतात.

**'समाजी जो पुरुषासी आदर, तैसाचि महिलांसि असावा व्यवहार**
**किंबहुना अधिक त्यांचा विचार, झाला पाहिजे समाजी ॥**

स्त्री व पुरुष हे देशाच्या रथाचे दोन चाके आहेत. देशाचे दोन्ही घटक जर उन्नत झाले तर येणाऱ्या नविन पिढीच्या भाग्याला काहीच उणिव राहणार नाहीत.

**' मुलांस विविध उच्च ज्ञान द्यावे , तैसेची मुर्लीनाही शिकवावे**
**हेळसांड करु नसे हे जाणावे, समाजाने॥**

आपण मुलांना जसे वेगवेगळया प्रकारचे ज्ञान देतो, त्याचप्रकारचे ज्ञान व शिक्षण मुलींनाही द्यावे.

**५) सर्व् धर्म् समभावाचे शिक्ष्ण :**

राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागण्यासाठी राष्ट्रसंत म्हणतात,

**जनसेवेचे प्रमाणपत्र् , त्यासी महत्व् यावे सर्वत्र् ।**
**उद्याचे राष्ट्र, आजचे कन्या-पुत्र् समजोनि त्यांना सुधारावे ॥**

जो जनसेवा केल्याचे प्रमाणपत्र् दाखविल त्यास सर्वत्रअग्रस्थान द्यावे. उद्याचे राष्ट्र आजच्या मुला मुलींचेच बनणार आहे, म्हणून त्यांना सुधारले पाहिजे.

समाजशिक्षण हे मानव समाजाला उन्न्तीच्या उंच शिखरावर नेणारे प्रथम साधन आहे. म्हणून सुंदर असा समाज निर्माण करण्याकरीता मुलासोबत मुलींनाही साक्ष करणे महत्वाचे आहे.

**'पाठशाळा असावी सुंदर, जेथे मुली-मुले होती साक्ष**
**काम करावयासि तत्र शिकती जेथे प्रत्यक्ष'**

**६) राष्ट्संतांचे पशुपालनासंबंधीचे विचार :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. ७५% लोकसंख्या शेतीवर अवलंबुन आहे. काळया आईला सुपीक ठेवायचे असेल तर पशुपालप करणे अत्यंत महत्वाचे आहे.

**भारत हा कृषिप्रधान देश, शेतीसाठी हवा गोवंश**
**गोरसाइतुका नसे सत्वांश, अन्य्त्र् शुध्द्**

शेती कसदार करायची असेल तर तिला उत्त्म खत लागते. गाई गुरांच्या खतामुळे शेतीचे आरोग्य् उत्तम राहते. म्हणून पशुपालन केले पाहिजे.

**ज्याचे घरी शेती आहे, त्यांने आवश्यची पाळावी गाय**
**मलमुत्र् सर्व उपयोगी राहे, ऐसी गाय माऊली ती**

ज्यांच्या कडे शेती आहे, त्यांनी गायीचे पालन करावे कारण गायीच्या मुलमुत्रापासुन भूमीचा कस राखला जातो. त्यामुळे उत्पादन चांगले होते.

**निष्कर्ष :**

१) संतांचे विचार विश्वाच्या कल्याणासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.
२) राष्ट्रसंतांनी दिशाहीन झालेल्या समाजाला दिशा दाखविण्याचा प्रयत्न् केला.

३) राष्ट्संतांचे विचार हे ग्रामीण जीवनाला दिशादर्शक ठरतात.

४) सर्व् ग्रामीण जीवनाला चैतन्याने उजळून टाकण्याचे सामर्थ् त्यांच्या विचारात आहे.

राष्ट्संतांचे विचार विलक्षण तेजाने भारले होते. कारण त्यांच्या कृतीतून व अंतकरणाच्या तळमळीतून ते स्फुरण पावले होते. वंदनीय राष्ट्संतांनी ग्रामगीतेच्या माध्य् मातून समाजाला शिक्षीत करुन बुवाबाजीपासून परावृत्त् केले. त्यांच्या उपदेशामुळे बलशाली समाज निर्माण झाला असून बलशाली भारत निर्माण होण्यासाठी त्यांच्या विचारांचा व जिवन कार्याचा प्रसार होण अत्यंत गरजेचे आहे.

**संदर्भ् सुची :**

१) संपादक भगत प्राचार्य् रा.तु. :- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ, चैतन्य् प्रकाशन , कोल्हापूर.

२) संपादक सावरकर स्व्. सुदामजी :- ग्रामगीता गुरुदेव प्रकाशन गुरुकुंज आश्रम ता. तिवसा जि. अमरावती

३) संपादक पिंजरकर ( गुंबळे ) डॉ. सुलभा के., गुल्हाने डॉ. गजानन ल. :- वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शैक्षिणक तत्व् ज्ञान , नभ प्रकाशन अमरावती

४) कोलते डॉ. वि.भी. :- मराठी संतांचे सामाजीक कार्य्